Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IVVXIIP0010
e-ISSN No. 2394-8426
DEC-2024
Issue–IV, Volume–XII

# स्मृतिस्थळातील आचार्य श्री केशिराजव्यास

**अश्विनी चंद्रकांत ढोरे**
M. A. Net Jrf

**प्रस्तावना:**

महानुभाव साहित्य इतिहासात लीळाचरित्रानंतर स्मृतिस्थळा चे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महानुभाव पंथात श्रुती, स्मृती, वृद्धाचार, मार्गरुढी व वर्तमान अशी एक परंपरा आहे. स्मृती म्हणजे नागदेवाचार्यांनी निश्चित केलेला कृतिरूप आचारधर्म. स्मृतीस्थळात एकूण २६१ स्मृती आहेत . श्री नागदेवाचार्यांच्या सहवासात असलेल्या कितीतरी व्यक्तींचे व्यक्तीचित्रे अत्यंत मोजक्या वर्णनात शब्दांकित झालेली आहेत . म्हणुनच स्मृतीस्थळाविषयी "बिनीच्या महानुभाव ग्रंथकाराची माहिती देणारा प्राचीनतम ग्रंथ हाच होय". असेजे बा वा. देशपांडे यांनी म्हटले ते अगदी सार्थ होय.

महानुभावांचा विचार पाहावयाचा असेल तर लीळाचरित्राकडे जावे लागते आणि महानुभावांचा उत्तुंग आदर्श पहायचा असेल तर स्मृतिस्थळा कडे यावे लागते. स्मृति स्थळ हा दुसरा प्रमाणग्रंथ आहे. कारण नागदेवाची वाणी ही देववाणी आहे. स्मृतिस्थळांचे लेखन परशराम व्यास आणि नरेंद्र बास यांनी केले. महानुभाव पंथात वा. ना. देशपांडे व रमेश आवलगावकर व शं.गो.तुळपुळें यांनी स्मृतिस्थळ ग्रंथांचे साक्षेपी संपादन केलेले आहे.

**स्मृतिस्थळ म्हणजे काय ?**

श्रुती गोसावी यांची, स्मृती ती भटोबांसाची महानुभावीय चरित्र वाड्मयातील 'स्मृतीस्थळ' हा ही एक चरित्रग्रंथ होय, महानुभाव पंथाचे प्रथम आचार्यश्री नागदेव भट यांचा श्रीचक्रधर स्वामीच्या प्रयाणानंतरचा जीवनपट ज्या स्मृतींनी अंकित केला तो स्मृतिसमुच्चय म्हणजे स्मृतिस्थळ या ग्रंथाची रचना शके 1235 च्या दरम्यान झालेली आहे.

लीळाचरित्रा प्रमाणे स्मृति स्थळाची भाषाही साधीच असून विलक्षण प्रभावी आहे. मुस्लीम आक्रमणाच्या धाडीचे राजकीय अस्थैर्याचे आलेले प्रसंगवर्णन उल्लेखनीय आहेत. इतिहासाच्या दृष्टीने स्मृतिस्थळ म्हणजे ऐतिहासिक नोंदीचा एक महत्वपूर्ण संदर्भग्रंथ होय.

आचार्य श्री नागदेवभटाचे धर्मनिष्ठ आचरण, विरक्ती, तपश्चर्या या धर्मशील सद् गुणांचे मंगल दर्शन स्मृती स्थळातून सहज घडते.

महानुभाव ग्रंथात चार प्रमाण ग्रंथ आहे श्रुती म्हणजे गोसाव्यांची ती श्रुती तर स्मृती ती भटटोबासांची पहिले चार हे प्रमाण ग्रंथ मानले जातात.

कुठल्याही गोष्टीचा आपल्याला जेव्हा संभ्रम निर्माण होतो तेव्हा त्यांचे उत्तर गोसावियांच्या शास्त्रामध्ये कुठे भेटते का ?तर ते जर मिळाले नाही तर् दुसरा प्रमाण ग्रंथ आपल्या हाताशी येतो तर तो म्हणजे स्मृति स्थळ.

**स्मृतीस्थळाचे महत्व :**

स्मृती स्थळ या ग्रंथाचे महत्व महानुभाव पंथात अनन्य साधारण आहे.

जर लीळाचरित्र हा सर्वज्ञांचा विचार असेल तर स्मृतिस्थळ हा महानुभव पंथाचा आचार आहे आचार जर कुठे पाहायचा असेल, तर आपल्याला स्मृती स्थळाकडे पहावा लागेल. आचार म्हणजे प्रत्यक्ष कृती आहे. विचाराने श्रेष्ठ असने हा एक पैलू आहे. विचाराचे श्रेष्ठत्व जेव्हा आचाराने दृष्य होते , उक्त होते म्हणून तेव्हा त्या कालखंडात आचार हा सगळ्यात मोठा प्रचार होता.

**स्मृती स्थळातील असंख्य पात्र -**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IVVXIIP0010
e-ISSN No. 2394-8426
DEC-2024
Issue–IV, Volume–XII

जसे समुद्र आहे, समुद्रामध्ये अनर्घ रत्न आहेत जी माणसे समुद्रावर व्यापार करायला गेली त्यांना कोणाला शंख मिळाले, कोणाला शिंपले मिळाले, त्यांनी तसा व्यापार केला. एक तिथेच राहुन खूप प्रयत्न केला, त्याने अनर्घरत्न मिळवले आणि तो रत्न तो घेऊन रत्नपारखी म्हणतो याचे मोलच करता येणार नाही इतक हे मौल्यवान आहे राजाने त्याचे फक्त दर्शन घेतले आणि राजाने ते दाखवायला आणलं म्हणून ओवाळणी दिली त्यातच त्याचा उदरनिर्वाह चालला उलट त्याचे रत्न आहे तसेच राहिले. इतरांनी ते शंख, शिंपले, सामान्य पदार्थ विकले काही पोहा भरतो पुन्हा त्यांना खाण्याची खंत निर्माण झाली. पण ज्याकडे अनर्घ रत्न आहे. त्याची मात्र आजन्म व्यवस्था झाली. आणि ते रत्न आहे - तसेच शिल्लक राहिले

तसं स्मृती स्थळामध्ये असंख्य पात्र आहे, की अशा रत्नांची खाण आहे

काही जन हिऱ्याची खाण खणतात, खणत असतांना खांब ठेवतात जेथे दर ढासळते तेथे टेकन देतात काहींच्या अंगावर दरड कोसळते तेव्हा काहींना हिरकणी सापडते काहींना षटकोनी हिरा तर काहींना चांगले रत्न मिळतात.

अशा स्मृतिस्थळाच्या स्मृतींच्या खाणीतून मला "श्री केशिराजव्यास". नावाचे रत्न मिळाले ते रत्न माझ्या मनाला अत्यंत भावले.

**श्री केशिराज बासांचे चरित्र :**

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या उत्तरापंथे प्रयाणा नंतर "तुझेनि मुखे अशास्त्रीय न निगे कीं गा" असा ज्याच्या बद्दल सार्थ विश्वास सर्वज्ञांनी व्यक्त केला, आणि त्यांच्या या विश्वासाला जराही धक्का न लागू देता, श्री स्वामींचा सर्व शिष्यपरिवार ज्या वडीलकीने आणि जिव्हाळयाने ज्यांनी सांभाळला अशा श्रीनागदेवाचार्याच्या सर्व विद्वान शिष्यपरिवारातील पं. केशोबास हे असाधारण व्यक्तिमत्वांचे पुरुष होते. विद्वत्व, पांडित्य, धर्म प्रेम ईश्वर निष्ठा, गुरुनिष्ठा, भक्तिचा ओलावा या सर्वगुणात अग्रणी शोभावे असे केशोबास, केशिवदया, केशिराज बास म्हणून ओळखले जातात. श्रीनागदेवाचार्याच्या शिष्य प्रभावातील श्रेष्ठ

उदात्त जीवन मुल्यांची प्राणपणाने जपणूक करणारे अत्यंत देखणे, पण ज्यांनी वैराग्याचा महान आदर्श महानुभाव पंथीया पुढे ठेवला, श्रीचक्रधर निरूपित ज्ञान सागर जनसामान्यांसी प्रवाहीत केला आणि भक्तिची पराकाष्ठा केली असे

पंडित केशिराज व्यास हे पापदंड रामपुरीचे (स्मृति 12] परभणी जिल्ह्यातील आहे.केशिराज व्यास हे अत्यंत पुराणिक होते विरक्ती उत्पन्न होऊन त्यांनी श्री नागदेवाचार्यापाशी जावून संन्यास दिक्षा घेतली. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान आचार विचाराने स्वीकारण्याची उत्कट इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

**" मी प्रवर्तला महामार्गी । तव महा विघ्ने केली लागी लेऊनी विचारांची वज्रांगी। प्रबोधु पुरसे पराभविली।।"**

श्रीनागदेवाचार्याजवळ पंथाची दिक्षा घेण्यापूर्वी त्यांचे लग्न झालेले होते पण प्रपंचामध्ये मन रमत नव्हते अतिशय विद्वान होते. सातत्याने मनामध्ये वैराग्याची भावना असायची ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. अटन, विजन, भिक्षा भोजन सर्व व्यवस्थित सुरू झालेला होता. एक दिवस त्यांचे सासरे गोपाळ पंडित श्री नागदेवाचार्याच्या आश्रमाकडं येतांना दिसतात, येऊन आचार्यांना सांगतात की आमचा केशव तुमच्या आश्रमात आला आहे त्याला आम्हाला घेऊन जायचे आहे. त्यांना जबरदस्तीने घरी घेऊन जातात त्यांना नाना प्रकारचा उपदेश करतात. अनेक विद्वान ब्राम्हणांशी पंडीताशी चर्चा घडवून आणल्या व केशिराजांना निरुत्तर करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. शेवटचा उपाय म्हणून पत्नीच्या सान्निध्यात तरी त्यांची विरागी वृत्ती भंग पावेल म्हणून दोघांना एकांतात ठेवले पण "माझा केशवू शुक योगिंद्र कीं गा" असे सार्थ अभिमानपर उदगार काढणा-या श्री नागदेवाचार्यचा विश्वास त्यांनी कायम ठेवला. रात्रभर पत्नीच्या मोहासी तोंड देऊन सकाळी ते नदीवर स्नानास जात व संध्या वंदनादी विधीआटोपून श्रीचक्रधरांच्या लीळा आठवत असत. त्यातूनच त्यांना "रत्नमाला स्तोत्र " हे काव्य स्फुरले ते त्यांनी संस्कृत मध्ये रचले.

या काळामध्ये श्री केशिराज व्यासांनी आपल्याला दाखवून दिले कि वेळेचा सदुपयोग कसा करावा अशा कठीण परिस्थितीत सुद्धा मनाला त्यांनी डगमगू दिले नाही. समोर भरभरीत अंगाची स्त्री उभी असून तिला दृष्टीनेही स्पर्श न करता एवढ्या कठीन प्रसंगातून

सुद्धा त्यांनी "रत्नामालास्तोत्र" लिहिले शेवटी पत्नीने त्यांच्या पुढे हात टेकले व म्हणाली "आता यासि जावो दया हे 'योगिये जाले : यांचे मज पाप लागत असे; " असा हा श्री केसोबासांचा वैराग्याचा अविचल निर्धार आहे.

एका प्रसंगातून दिसून येतो कि एकदा अटनास एकटेच बाहेर पडले एका श्रीमंत व्यापा-याच्या घरापुढे भिक्षेस उभे राहिले भिक्षा द्यावयास आलेली व्यापाऱ्याची सुंदर कन्या त्यांच्या रूपावर भाळली व "कोठे असणे" विचारू लागली पण उदासीन श्री केशिराज तिच्याकडे लक्ष न देता पुढे चालू लागले. तिने त्यांचा मागोवा घेतला व रात्री ते ज्या ठिकाणी विश्रांतीला थांबले होते त्या देवळात गेली. देवळातला गुरव रात्री गेला होता, तेवढ्यात ती स्त्री येऊन मांडीवर जाऊन बसली अभिलाषेचा जराही वारा न लागलेला 'ज्ञानसूर्य त्यांनी तिचे मनोगत साधले शुक योग्याप्रमाणे ते म्हणाले, " तुम्ही म्हणाल ते ऐकतो, पण मी जरा बाहेर जाऊन येतो" अशी समयसूचकता दाखवून श्री केशिराज आपले सर्व सामान तिला शंका येवू नये म्हणून तिथेच टाकून देऊन तडक तेथून निघाले.यावर श्री आचार्य म्हणतात "एके अनिष्ट आलेया आपणीयाते राखिले: एकि एकाते राखिले : केशवदेनि समस्त मार्गाते राखिले गा' असे म्हणत.

**श्री केशिराजबासांचे आचरण :**

शुकयोगिंद्र माझा म्हणून नागदेवही सुखावले परंतु पुन्हा त्या कन्येच्या घरी केशवा पाठविले ।।

ज्या देखणे पणामुळे केशिराजावर हा प्रसंग आला, त्यासाठी अप्रत्यक्षपणे रूपवान केशिराजच कारणीभूत होते. तेव्हा त्या स्रीच्या मनात आलेला विकार त्यांनीच घालवायला पाहिजे, कारण असे जर केले नाही तर तिच्या विकार वृत्तीचे पाप त्यांच्या माथी लागेल म्हणून तिच्या मनात त्याच्या बद्दल उत्पन्न झालेली विकार लालसा नष्ट करणे आवश्यक होते यासाठी केशिरांजाना भटोबासांनी देहाची अनास्था करण्याचा उपाय सांगितला आपल्या या सुंदर देहामुळे हा प्रसंग ओढवला

म्हणून दुःख करू लागले. अटनाचेनि क्रमे देह तुटल्यामुळे ते घाणेरडे, ओंगळ दिसू लागले अशा अवस्थेत ते त्याच तरुणीच्या घरी भिक्षेस गेले.

भिक्षा आवाजाने पूर्ण वेधली धावत आली रूपवती।
शवासम तो केशव विसरला घृणा वाटली तिच्यामनी ।।
तुला पाहुनी पोर थुंकली हाची मिळाला हार तुला।
त्या चुकीचा भाव कळाला या विश्वातील ज्ञान्याला ॥

हे पाहुन केशिराजांना अत्यंत आनंद झाला, आणि हा अतुल आनंद उत्स्फूर्त उद्‌गारातून ओसंडला "हा नव्हे मी श्रीचक्रधरांचा केशवदया :

**श्री केशिराज बासांचा त्याग -:**

पंथीय आचार विचारांच्या बाबतीत केशिराजबास नेहमीच दक्ष असत. मार्गचाराप्रमाणे एकदा ते दामोदर पंडित आणि भास्कर भट्ट बोरीकर यांच्या समवेत अटनास गेले. तिघांपैकी फक्त केशिराजांच्या पायात वाहाना होत्या बाकी दोघे अनवाणी चालत होते. ते तिघे रस्त्याने जात असलेले पाहून मार्गाचा एक वाटसरू म्हणाला 'हे अवघे भटमार्गीचे महात्मे दिसति: हा एक मात्र नव्हे 'का? तर याच्या पायात वाहाणा आहेत हे ऐकताच केशिराजांनी त्या तोडून फेकून दिल्या. परमार्गीच्या निष्कलंक चारित्र्यावर लोक निंदेचा शिंतोडाही उडू नये म्हणून ते सदैव काळजी घेत : भट्टो बास त्यांना म्हणतात " पंडिता केशवदेया, सर्वांगी कार देखणे असे : देखने ते डोळेनिची की : तुम्ही माझे डोळे कीं गा केशवदया"

वैराग्य पाळण्याच्या भरात, एकदा अरण्यात पंडित केशिराज गेले असता त्यांची बहिण कामाइसा त्यांच्या जवळ शास्र संवाद करण्यास जाऊन बसली त्यांनी कामाइसाची चांगली कानउघडणी केली व श्री केसोबास म्हणाले.

"कामाए आजि लागुनि ऐसे नेइजे की: लोक अपवादू बोलैल यातव लोकां पाप घडेल : भांवडे ऐसे गुरुकुल जाने: परि लोकू नेणे की : " असाही त्याग पंडित केशिराजांनी केला .

**- श्री केशिराजबास रसाळ वक्तृत्वाची जोड वगुणांचा समुच्चय-:**

ईश्वर कृपेने केशिराजांच्या विद्वतेला रसाळ वत्कृत्वाची जोड मिळाली आहे. रूपगुणसंपन्न केशिराज आपल्या तीव्र बुद्धिमत्तेच्या जोरावर व भक्तियुक्त अंत:करणाच्या जिव्हाळयाने श्रोत्यांची अंतकरणे चंद्रमय करून टाकत शरीर सौदर्य, विद्वता, रसिकता व वकृत्व कला या सर्वांचा सुंदर परिचय एकत्रित मिळणे फारच दुर्लभ आहे. "ज्ञानाचा पाठी वैराग्य उपजे "

श्री नागदेवाचार्यांनी प्रसंगोपात ज्या आचार विचारांचे निरूपन सर्वज्ञांच्या शिकवणीवर हुकुम केले ते पुर्वत: आचरणात आणणाऱ्या त्यांच्या काही निवडक शिष्यांपैकी श्री केशिराजांचे स्थान अनेक दृष्टीने अनन्यसाधारण आहे केशिराज हे ज्ञान, भक्ति व वैराग्य या त्रिदंडी युक्त आचरणाचे होते. ज्ञान पूर्ण विद्वता अनन्यभकती, श्रद्धा निष्ठा, विनम्रता, शालीनता आणि वैराग्य अशा सर्व निवृत्ती मार्गास अनुकुल गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्व परिपूर्ण होते. श्री केशिराज बासांचा पहिला अलौकिक गुण म्हणजे गुरु भक्ती होता.त्यांना आपले गुरु श्री नागदेवाचार्या- बद्दल नितांत श्रध्दा होती त्यांची प्रत्येक आज्ञा ते प्रमाण मानत असत. संस्कृतात ग्रंथरचना करण्याची अनिवार प्रवृत्ती असूनही केवळ आचार्यांच्या शब्दाखातर त्यांनी श्रीचक्रधरांनी निरूपण केलेल्या मराठीची कास धरली, आणि श्रीमुखीची वचने, सुत्रे दृष्टांतसुबोध सोपी केली. त्यावर अर्थसुलभ असे भाष्यही केले श्री स्वामींची स्तुतीपर स्तोत्रेही रचली, ते केवळ आचार्यांच्या आज्ञेने शास्त्र चर्चा करण्याची अतोनात आवड असूनही देवासारख्या सख्या सुहृदाची त्रुटी होण्याचा संभव असे प्रत्यक्ष आचार्यांच्या वाणीतून निघालेले वाक्य प्रमाण मानून शास्त्र चर्चेचा अभ्यास केला आचार्यानी जे काही निरुपिले, ते आचार विचारात रुजवणे हेच त्यांनी ध्येय मानले. ईश्वराबद्दलची नितांत श्रध्दा गुरुबद्दलचा आदर, आपल्या मार्गाची शिस्त वर्तन कर्तव्य पार पाडण्याची विनम्र भूमिका इत्यादी गुणांमुळे आज पंथीयामध्ये ते श्रेष्ठ स्थानाचे मानकरी ठरले आहेत.

**श्री केशिराजबासांची साहित्य सेवा:**

केशिराजांनी संकलित केलेले व स्वतंत्र निर्मिती केलेले ग्रंथसाहित्य आपल्या तेजस्वी अशा आल्हादक दीप्तीने वाचकांना भारून टाकण्यास समर्थ आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामींच्या लीळाचरित्र या ग्रंथातील उपदेश केशिराजबास यांनी इ.स. १२८५ च्या सुमारास संकलित केला. याचा प्रथम सुत्र, दृष्टांत व दार्ष्टांतिक असा रचनाक्रम आहे. दृष्टांत पाठात अनेक लोककथा गुंफल्या आहे. प्रकार १. अंशग्राहय २. समग्रांश ३. अन्वय ४. अप्रत्यान्वय ५. योगज ६. वास्तव.त्यात सुत्रपाठ नऊ प्रकरणे, आचार, विचार, दृष्टांत याचा अन्वय लावला.

मराठी ग्रंथलेखन

१. श्रीचक्रधरोक्त सुत्रपाठ २. मुर्तिप्रकाश ३. लापणिक ४. दृष्टांतपाठ

संस्कृत ग्रंथलेखन १. रत्नमाला स्तोत्र २. ज्ञानकलानिधीस्तोत्र ३.दृष्टांत स्तोत्र

पंथाच्या ग्रंथ संपादनात मोलाची भर घातली

**समारोप -:**

श्री केशिराज बासांना सुरूवाती पासूनच धर्म चर्चेची अतिशय आवड होती, पंथात आल्या नंतर प्रवृती मार्गाचा सर्वस्वी त्याग केल्यानंतर एका धर्मा विषयातच त्यांचे मन रमणे स्वाभाविकच होते. पंडित बासांनी सर्व विकारांवर मात केली होती. सर्वज्ञ म्हणतात की "नरवीर आति पर विषयवीर नाही "म्हणजे स्वामींच्या हया मुद्यालाही यांनी खोट ठरवल स्वतःचे मत सिद्ध करून दाखवले.

जो आपल्याला शत्रु दिसतो त्याला आपण पराभूत करू शकलो आणि जो शत्रू आपल्याला कधी दिसतच नाही फक्त पाठिमागून वार करतो त्या शत्रूवर सुद्धा विजय मिळवण्याचा प्रयत्न विकाराच्या माध्यमातून श्रीकेशिराज बास यांनीकेला.

भट्टोबास प्रशंसा करतांना म्हणतात की' माझे शास्त्र म्हाइमभट्टा लक्ष्मीधरां चेनि नुजळेचि : ते पंडित केशवदे यासि चर्चा करिता उजळे।

अशाप्रकारे आचार्य श्री केशिराजांचे चालणं, उठणं, बोलण, विहरण, वर्तन सर्व प्रकारचे एक आदर्श होते अशाप्रकारे श्री के शिराज सर्वार्थाने आदर्श होते. त्यांच्या जीवनमुल्यांची प्रतिष्ठापणा आपल्याला आपल्या आयुष्यात करता आली पाहिजे.परमेश्वर प्राप्तीच्या मार्गावर जात असताना त्यांनी सर्व अडथळयांवर मात केली.तसेच मनुष्याने आपल्या जीवनाच्या अंतिम ध्येयाकडे जात असताना सर्व अडथळे दुर करुन त्यावर विजय मिळवला पाहिजे,तरच खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक होईल.

**निष्कर्ष**

१) महानुभाव साहित्यामध्ये केशिराजबासांच्या ग्रंथसंपदेला अनन्य साधारण महत्व आहे महानुभाव साहित्यात केशिराजबासांचे स्थान हे अलौकिक आहे.

2)केशिराजबासांचे

मराठी तसेच संस्कृतमधील ग्रंथरचना म्हणजे एकप्रकारे भक्तीचा, तत्वज्ञानाचा उत्कट झरा आहे, असे वाटते.

३) चक्रधरांचे तत्वज्ञान विद्वानांना रुचेल अशा रीतीने मराठीतून मांडणे व अध्यात्मासारखे शास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्दसंपत्ती केशिराजबासाचे मराठीत रूढ करणे हे केशिराजबासाचे मोठे कार्य आहे.

४) मराठी लोककथांचे पहिले वहिले संकलन ही केशिराजबासांच्या दृष्टांतपाठ या ग्रंथातून दिसते. तसेच महानुभावांच्या सर्व साहित्याचा पाया त्यांच्या "सुत्रपाठ" या ग्रंथातुनच घेतला जातो.

**संदर्भ ग्रंथ**

१. देशपांडे वा. ना. (संपा) स्मृतीस्थळ व्हीनस प्रकाशन, पुणे

२. आवलगावकर डॉ.रमेश वामन, (संपा.) स्मृतीस्थळ, चंद्रकला प्रकाशन, पुणे

३. कोळपकर मुरलीधर, महानुभावांचा इतिहास

४. तुळपुळे, शं. गो. महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, व्हीनस प्रकाशन, पुणे १९७६

५. पठाण यू. म. (संपा.) स्मृतीस्थळ, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, १९७४